# नागपूर महानगरपालिका,नागपूर

**(नागपूर अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग)**

माहितीचा अधिकार अधिनियम- 2005 अंतर्गत स्वयंप्रेरणेने
प्रकाशित/प्रसिद्ध करावयाची माहिती

| | |
|---|---|
| 4 (1) एक | **अग्निशमन विभागाची रचना कार्य व कर्तव्य यांचा तपशील**<br>**नागपूर अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाची रचना** : मुख्य अग्निशमन कार्यालय हे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय ईमारती मध्ये मा. आयुक्त् यांचे आदेशान्वये स्थापित करण्यता आले असून यापुर्वी हे कार्यालय इंग्रज राजवटीत असलेल्या ईमारतीमध्ये सन १९३९ पासून कार्यरत होते. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग हा महानगरपालिकेचा एक स्वतंत्र विभाग असून महाराष्ट्र राज्य सरकारचे नगरविकास मंत्रालय, मुंबई यांचे नियंत्रणात असलेले नागपूर अगिनशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता फक्त १३ केंद्राची पदांना मंजूरी प्राप्त आहे. व सध्यास्थितीत एकूण 11 अग्निशमन केंद्र महानगरपालिकेच्या मंजूरीने कार्यरत असून, हे सर्व केंद्र प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचे नियंत्रणात आहेत.<br>अग्निशमन विभागाच्या कार्यरत व रिक्त पदांची संख्या दर्शविणारी स्थिती दर्शक तक्ता (Flow Chart) महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरील अग्निशमन विभागाचे टॅब वर प्रसिध्द करण्यात आला आहे.<br>**नागपूर अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे कार्य/कर्तय :** 1. NMC कायदा 1949, क्र. कलम 285 नुसार आवश्यक असलेले 59 फायर बंब इ. फायर बंब इ. आवश्यक.<br>2. NMC Act १९४९, No. ५९ कलम २८६ नुसार आगीच्या ठिकाणी अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिका-याचे अधिकारी<br>3 NMC Act १९४९, No. ५९ कलम २८७ नुसार पोलीस आणि नगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निशामक पथकास साहाय्य करणे.<br>4. NMC कायदा 1949, क्र. 59 कलम 288 अन्वये, अग्निशमन दलाचे नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान मानले जाते.<br>5. NMC Act १९४९, No. ५९ कलम २८८ नुसार आगीचे प्रतिवृत्त सादर करणे.<br>6. कार्यालय नगापूर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्रमांक साप्रवि/२१०६/एम. दि. २०/०२/२०१३ अन्वये (अ) नागरीकांची सनद तयार करणे, (ब) सादरीकरणाचे टप्पे कमी करणे (क) कार्यालयीन धारिका निकाली काढणे. |

| | |
|---|---|
| | 7. अग्निसुरक्षा व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ३ व डी.सी.आर.-A २००० (नागपूर) चे कलम ६.६.२, UDCPR-2020 above 2.24 नुसार ईमारतीचे बांधकामाकरीता नकाशे तपासून, आग सरंक्षक मान्यता प्रमाणपत्र  मान्यता देणे.<br>8. विविध व्यवसायासाठी अग्निसुरक्षा दृष्टीने ना-हरकत प्रमाणपत्र देणे.<br>9. तात्पुरते बांधकाम, मंडप, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शनी करीता ना-हरकत प्रमाणपत्र देणे.<br>10. आगीच्या/दुर्घटनेचा अहवाल देणे.<br>11. अग्निशमन विभागाचे संर्वागिन विकासाकरीता प्रस्ताव तयार करणे<br>12. अग्निशमन विभागात कर्मचा-यांच्या सेवा भरती करीता प्रस्ताव मा. उपआयुक्त यांचे मंजुरी नंतर मा. आयुक्त्, तथा म.न.पा. समितीकडे पाठविणे.<br>13. अग्निशमन वाहनावर होणारा खर्चा संबंधात अग्रीम काढून वाहन दुरुस्ती करणे.<br>यावरुन नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आपत्कालीन सेवा, विभागाचे कर्तव्य हे महाराष्ट्र महानगरपालिका कायदा १९४९ नुसार सार्वजनिक लोक संस्थाचे आदेशानुसार पार पाडल्या जाते. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्या कार्यभार हा महानगरपालिका आयुक्त् यांचे सरळ नियंत्रणात येत असल्यामुळे शासनाचे प्रशासकीय कामकाजासारखे कामकाज हे महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल, वर्तणूक नियमानुसार होत असते. |